# प्रेस नोट

जा.क्रं.माहिती कक्ष/वार्तापत्र/२०१७,
कार्यालय पोलीस अधीक्षक, भंडारा,
दिनांक :– ०२/०२/२०१७.

## ''मोबाईल पोलीस स्टेशन''
## (फिरते पोलीस स्टेशन)

भंडारा :– पोलीस विभाग भंडारा चे वतीने भंडारा जिल्हयात पोलीस अधीक्षक, भंडारा श्रीमती विनीता साहू यांचे संकल्पनेतून ''मोबाईल पोलीस स्टेशन'' (फिरते पोलीस स्टेशन) लोकार्पन दिनांक २८/०१/२०१७ रोजी भंडारा पोलीस स्टेशन अंतर्गत मेढा येथे करण्यात आले होते. त्यास अनुसरून यापुढे भंडारा जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत आठवडयाचे प्रत्येक शनिवारी 'मोबाईल पोलीस स्टेशन' ची मोहीम राबविण्यात येणार आहे. दिनांक ०४/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हयातील पोलीस स्टेशन पवनी (ग्राम सिरसाळा), अडयाळ (ग्राम भावळ), तुमसर (ग्राम मेहगांव ), साकोली (ग्राम विरसी ), लाखनी (ग्राम पोहरा), लाखांदूर (ग्राम सरांडी बुज.), दिघोरी (ग्राम मानेगाव ), गोबरवाही (ग्राम लेडेंझरी), भंडारा (चांदणी चौक ), वरठी (ग्राम मोहगांव देवी), जवाहरनगर (ग्राम शहापूर),मोहाडी (ग्राम बेटाळा), कारधा ग्रामिण (ग्राम दिघोरी (आंमगाव) आणि पालांदूर (ग्राम मांगली ) या ठिकाणी पोलीस स्टेशनचे अधिकारी व बिट जमादार यांचे मार्फतीने सदर मोहीम राबविण्यात येणार आहे. करिता आजुबाजूचे गावातील/ परिसरातील सर्व नागरिकांनी भेट देवून त्यांचे समस्यांबाबत निराकरण करावे. तसेच सदर कार्यक्रमामध्ये गावातील पोलीस पाटील, सरपंच, पोलीस मित्र, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष/सदस्यगण व सामाजिक कार्यकर्ते हजर राहणार असून नागरिकांनी या मोहिमेत मोठया संख्येने उपस्थित राहून सहभाग घ्यावा,असे आवाहन पोलीस अधीक्षक, भंडारा, विनिता साहू यांनी केले आहे.

(बी.आर.गाडे)
प्र.पोलीस उपअधीक्षक (गृह),
भंडारा.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत,

**संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.